# प्रेस नोट १५/०९/२०२३

**" साकीनाका पोलीस ठाणे दाखल गुरक्र. ८९४/२३ कलम ४५७,३८० भादवि मधील कैसीनो खेळण्याकरीता घरफोडी करून चोरी करणा-या सराईत आरोपीतास रांची,राज्य-झारखंड येथुन अटक करून गुन्हयातील चोरी केलेला 100% मुद्दे्माल हस्तगत केलेबाबत "**

फिर्यादी श्री मोहम्मद युसुफ अब्दुल रहीम शेख, वय-२४ वर्षे,धंदा व्यवसाय, रा.ठी.सी/०९,पंचशील सोसायटी,अंजुमन हायस्कुलचे समोर, टिळकनगर, साकीनाका मुबई यांनी समक्ष साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई येथे हजर राहुन तक्रार दिली की, दि.०५/०९/२०२३ रोजी २३:०० ते दि.०६/०९/२०२३ रोजी ०४:०० वा. चे दरम्यान रहाते घरी पत्ता- सी/०९, पंचशील सोसायटी, अंजुमन हायस्कुलचे समोर, टिळकनगर, साकीनाका मुबई याठिकाणी दरवाजाची कडी-कोयंडा तोडुन कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घरातुन एकुण अंदाजे ३,३०,०००/- रू किंमतीचे सोन्याचे दागीने चोरी केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरून साकीनाका पोलीस ठाणे गु.र. क्र.८९४/२३ कलम ४५७,३८० भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

साकीनाका पोलीस ठाणेस दाखल वर गुन्हयाचा तपास करत असताना नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी हा गुन्हा केल्यानंतर रांची झारखंड येथे गेल्याने तांत्रीक तपासावरून निष्पन्न झाल्याने गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि राजेंद्र नागरे व पथक हे रांची, झारखंड येथे रवाना झाले. तसेच रांची,झारखंड येथे जावुन तेथील स्थानिक पोलीस ठाणेची मदत घेवुन तांत्रीक तपास करून पाहीजे आरोपीतास रांची रेल्वे स्टेशन,झारखंड येथुन ताब्यात घेवुन त्याचा वर नमुद गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास चुटिया पोलीस ठाणे,रांची,झारखंड येथे अटक करण्यात आली.

## अटक आरोपी नाव व पत्ता

अभिमन्यु अर्जुन गुप्ता,वय-३१ वर्षे,व्यवसाय-नाही, रा.ठी-रूम नं-७९४, बि एम के कंपाउंड, वाडीया इस्टेट रोड,कुर्ला बैल बाजार, कुर्ला (पुर्व) मुंबई,मुळ गाव-हनुमान मंदीरा समोर,भवानी गंज, पोस्ट-डोंगरीया गंज, ठाणा-भवानी गंज, जि.सिध्दार्थ नगर, राज्य-उत्तर प्रदेश.

## आरोपीकडुन हस्तगत करण्यात आलेली मालमत्ता

७६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने एकुण अंदाजे किंमत-३,३०,०००/-रूपये

**अटक आरोपीता विरोधात यापुर्वी मुंबई,ठाणे,नवी मुंबई परीसरात एकुण १३ चोरी व घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.**

सदरची यशस्वी कामगीरी मा.पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री.सत्यनारायण चौधरी, मा.अपर पोलीस आयुक्त श्री.परमजीत सिंह दहिया,पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.पोलीस उप आयुक्त श्री.दत्ता नलावडे परिमंडळ-१०,मुंबई, यांचे मार्गदर्शनाखाली मा.सहायक पोलीस आयुक्त श्री.भारतकुमार सुर्यवंशी, साकीनाका विभाग, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.गबाजी चिमटे ,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.योगेश शिंदे यांचे सुचनेप्रमाणे साकीनाका पोलीस ठाणेचे पो.उप.नि.राजेंद्र नागरे, पो.ह.दिपक कदम , पो.शि.अय्याज शेख, पो.शि.अनिल करांडे, पो.शि.रिकी सौंदरमल, पो.शि.परेश शिगवण व पो.ना.विशाल पिसाळ यांनी केली आहे.